# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२५/४०९
दिनांक :- ७/२/२०२५

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीचा शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबजावणीबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२४-२५/६४ दिनांक :- ६/०२/२०२५.
२.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- विकाक-२०२५/प्र.क्र.१८/तांशि ४ दि. ३०/१/२०२५.
३.मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दिनांक ४/२/२०२५ रोजी प्रत्यक्ष भेटी दरम्याण दिलेल्या सुचना.
४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/१७६४ दि. १९ जुलै २०२४
५.विकाअ/शिक्षण/२०२४/१७९५ दिनांक २३ जुलै २०२४.
६.विकाअ/शिक्षण/२०२४/२०१३ दिनांक १३ ऑगष्ट २०२४.
७.विकाअ/शिक्षण/२०२४/२०२६ २३ ऑगष्ट २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.मंत्रीमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ४/२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाची प्रभावी अमलबजावणी करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये तसेच वेळोवेळी घेतलेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये विद्यार्थीनीकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क घेण्यात येऊ नये असे वारंवार कळविण्यात आलेले हाते.

याबाबत आपणास विस्तृत कळविण्यात येते की, राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीचा शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबजावणीबाबत व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ शासनामार्फत देण्यात येणार असुनही, शैक्षणिक संस्थाकडून मुलींना प्रवेशावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनीच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापिठे, शासकीय अभिमत विद्यापिठे (खाजगी अभिमत

विद्यापिठे/स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापिठे वगळुन) व सार्वजनिक विद्यापिठांतर्गत येणा-या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission process Cap)(व्यवस्थापन कोटयातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळुन ) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिक दृष्टया मागास (EBC) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पुर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनिकरण केलेल्या) मुलींच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधनिद्रव्ये विभाग, कृषी पशुसंवर्धन व दुग्धविकास विकास विभाग मत्सव्यवसाय विभाग, व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणा-या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे तेव्हा अश्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्काची संपुर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अश्या संस्थाविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते.

तसेच सदर प्रकरणी चौकशी करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ६ अन्वये तपासणी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली होती त्याप्रमाणे नियुक्त तपासणी अधिकारी यांनी आपल्या संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थीनीशी प्रत्यक्ष संपर्क साधुन याबाबत शहानिशा करण्यात आलेली आहे. चौकशी अंती काही संस्थेमध्ये विद्यार्थीनीकडुन ५० टक्के शिक्षण शुल्क घेतलेले असल्याचे निदर्शनास आलेले आहे याबाबत तपासणी अधिकारी यांनी आपणास समज दिल्यामुळे अश्या संस्थांनी सबंधित विद्यार्थीनीस सदरचे शुल्क तात्काळ परत केले जाईल असे कळविलेले आहे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी विद्यार्थीनीकडून ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क घेतलेले आहे अश्या संस्थांनी सदरचे शुल्क परत केले किंवा कसे? याबाबतची माहीती सोबत जोडलेल्या प्रपत्रात **दिनांक ११/२/२०२५ रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावी, यामध्ये संस्था दोषी आढळल्यास संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करुन तसा अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**(मनोज म. अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सविनय सादर.
२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

**शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वी ज्या मुलींकडून पुर्ण अथवा ५० टक्के शुल्क जाम करण्यात आलेले होते अश्या सबंधित विद्यार्थीनीकडून शुल्क परत केल्याबाबतचा अहवाल.**

**प्रपत्र.**

| अ.क्र. | प्रवेश वर्ष | विद्यार्थीनींची संख्या | शुल्क परतावा रक्कम | चेक/बँकेमार्फत रक्कम जमा केल्याबाबत पुरावा |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी निरंक.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे**

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ६४
दिनांक:- 06/02/2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

विषय:- राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबाजणीबाबत...

संदर्भ:- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. विकाक-२०२५/प्र.क्र.१८/तांशि-४, दि.३०/०१/२०२५.
२. मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि. ०४/०२/२०२५ रोजी प्रत्यक्ष भेटी दरम्यान दिलेल्या सुचना.

मा. मंत्रीमहोदय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०४/०२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबाजणी करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

(१) शासन परिपत्रक क्र. शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४ व संचालनालयाचे परिपत्रक क्र. १८/ तंशिसं/ डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८, दि.०९/०९/२०२४ नुसार संस्थांमार्फत मुलींकडून प्रवेशाच्या वेळी कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्यात येऊ नये असे कळविण्यात आलेले होते. तरीही काही संस्थांकडून याबाबत कार्यवाही होत नाही अश्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत काय? आपल्या स्तरावरुन काय कार्यवाही केली ?

(२) संदर्भांकित शासन निर्णय निर्गमित होणे पूर्वी काही संस्थांमार्फत मुलींकडून पूर्ण अथवा ५० टक्के शुल्क जमा करण्यात आलेले असल्यास संबंधित विद्यार्थीनीस शुल्क परत केल्याबाबतचा अहवाल खालील प्रमाणे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | प्रवेश वर्ष | विद्यार्थीनींची संख्या | शुल्क परतावा रक्कम | चेक/बॅकेमार्फत रक्कम जमा केल्याबाबत पुरावा |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |

वरील मुद्यांबाबत आपल्या विभागातंर्गत ज्या संस्थांकडून जास्त प्रमाणात तक्रारी प्राप्त झालेल्या असतील अश्या संस्थांना सहसंचालक/सहाय्यक संचालक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्याबाबतचा कार्यवाही अहवाल संचालनालयास दि. १२/०२/२०२५ पर्यंत पाठविण्यात यावा.

याबाबत विभागीय कार्यालयाचे सर्व सहसंचालक यांना कळविण्यात येते की, राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ दि. ०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ पासून लागू करण्यात आला आहे. शासन निर्णयाची अमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने दि.१९/०७/२०२४ व ०९/०९/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांचे काटेकारपणे पालन करण्याबाबत आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना पुन्हा कळविण्यात यावे, व सुचनांचे पालन न करणाऱ्या संस्थाविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश द्यावेत.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.
(लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी)